देश कानन प्रचंड॥सरिता सागर तीर्थ उदंड॥पापसंहार करे खिली॥४३॥शिव चरित्र विष्णु
चरित्र॥शक्ति संख्याने अति विचित्र॥सोमकांत पाषाणीं सरोवरें॥सोपाने सुंदरें बांधली॥४४॥
उष्णोदकाच्या पुष्करणी॥मंगळ स्नान करितां जनी॥तनु वरी राज केला येते त्क्षणी॥नव
ल करणी मायांची॥४५॥स्फटिक भूमी देखोन॥भुलती पाहातया चें नमन॥कीं मरलें येथें
जीवन॥वस्त्रें सावरून चालती॥४६॥जेथें भरले असें जळ॥ते भूमी जैसें दिसे केवळ॥

वस्त्रें सावरिती आकुशल॥ तो सभा सकळ हासे वरी॥४७॥ आंत बाहेर निर्मळ दिसती॥ सतेज काश्मि
राच्या भिंती॥ मार्ग ह्मणाउन बरळ धांवती॥ तों ते आदळती भिंतीसी॥४८॥ केली हिरयाची कवाडे क
डोविकडी॥ झांकिली कीं नकळती उघडी॥ प्रवेशतां संशय पाडी॥ मग हस्तें करून चांचपती॥४९॥
सरोवरी सुवर्णकमळें सुवास॥ हे कळा हाविली विशेष॥ वरी नीळयाचे भ्रमर साव काश॥ रं
जी घालिती आनंदें॥५०॥ हिरयाचे मच्छ तळपती॥ पाचूंची कासवें आंगळ पविती॥ काश्मिराचे बक
धांवती॥ मच्छ धरावया कारणें॥५१॥ त्रिभुवनसौंदर्य एकवटलें॥ ते मयसभेवरी वोतलें॥ ते सभा स्थ
ळ जेणे विलोकिलें॥ तेणें देखिलें ब्रह्मांड॥५२॥ सभेसी जातां मार्ग शिमलें॥ चंदनाचें सडे घातले॥ पुष्पभा
र विखुरिलें॥ मृगमद लिंपिले भिंतिभागों॥५३॥ सभा सौंदर्य हाचि समुद्र॥ पाहात याचें क्षुचे पोहणा
र॥ ते पवती पैलपार॥ आलीकडे चुबकती॥५४॥ कीं सभासागराचें पैल तीर॥ मनविहंगम चपळ थो
र॥ पावावया नाही धीर॥ ते जावत्तरि पडे पैं॥५५॥ ज्यां ज्यां पदार्थाकडे पाहाती प्राणी॥ तिकडे चि चित्त जाये

॥१॥

जडोनी॥ दिवसकिं वा आहे जे दोनी॥ पाहात यासी समजेना॥ ५६॥ स्वर्ग मृत्य पाताळ शोधितां॥ ऐसी सभा ना
हीं तत्वता॥ धन्य तो मयासुर निर्मिता॥ विरंचीअंशसंभवें॥ ५७॥ आरक्त पेटावे चांद वे दिसती॥ मुक्तचो
षमो वं ते शोभती॥ दिव्य अस्तरणे पसरिली क्षिती॥ गाद्यां झलकती तयाच्या॥ ५८॥ आसो राजसय ज्ञ
सजें जें आलें॥ तिनु के मयसभेवरी चढिलें॥ राज ऋषीसर्व बैसविलें॥ ठाईं ठाईं सन्मानें॥ ५९॥ धर्मे
आहेरासि द्ध केले॥ वस्त्र आभरणांचे पर्वत पडिले॥ मुख्य सिंहासन मध्ये घातले॥ अग्रपूजा कराव
या॥ ६०॥ भीष्म म्हणे धर्मराया॥ आचार्य ऋत्विज ऋषिवर्या॥ यथायोग्य पाहोनियां॥ पूजा समग्र
समर्पी॥ ६१॥ पुरुषा लागी सल भूषण॥ तीन वस्त्रें कनक वर्ण॥ द्वादशांगी अलंकार लेणे॥ स्त्रियास
देणे तैसें ची॥ ६२॥ अंतरवसन बाहेरवसन॥ कंचुकी वैरणे प्रावर्ण॥ पंचवस्त्रे संपूर्ण॥ स्त्रियाल
गी देईकां॥ ६३॥ तो धर्म म्हणे कुरुनायका॥ मांडियाजनकाचीया जनका॥ आग्रपूजेचा अधिका
री देखा॥ कोण मज निरोपी॥ ६५॥ भीष्म म्हणे पंडुसुता॥ या श्रीकृष्णाहून थोर परता॥ हे ब्रह्मांड

॥१॥

शोधिता॥ श्रेष्ठ नाही आणिक॥ ६६॥ हा जळजोद्भवाचा जनिता॥ आपर्णापती वंदी माथा॥ शक्राची शक्रपद पाहता॥ ये णेरूपे नेदी धले॥ ६७॥ जो जगदंकुर मूळकंद॥ जो त्रिभुवनमंदिरस्तंभ अभेद॥ जो विश्वंभर ब्रह्मानंद॥ या हून थोर कोण असे॥ ६८॥ हृदये वैकुंठ ज्यांत॥ जे विरंचीचे आराध्य दैवत॥ अंतःकर्णसबळी माजि वाहात॥ सनकादिकादिक अत्यादरे॥ ६९॥ हाचि मूळमायेचा भर्त्ता॥ हाचि अनंत ब्रह्मांडे कर्त्ता॥ कैवल्य भांडारीचे ठेवणे तत्वता॥ सगुण भक्ता लागी जाला॥ ७०॥ वेद पुराण शास्त्रां अर्थ करीती चित्रविचित्र॥ तो हाच जाण राजीवनेत्र॥ कोमळ गात्र श्रीरंग॥ ७१॥ लंपद तत्पद असीपद॥ याहून वेगळा शुध्द बुध्द॥ असे वेदांतशास्त्र गर्जे आगाध॥ तो हा गोविंद वोळखे॥ ७२॥ मीमांसक स्थापिती कर्मी॥ आचारावे ज्यां लागी धर्मी॥ तो हा जाण पुरुषोत्तम॥ उच्छिष्ट काढी तुझ्या येथे॥ ७३॥ नयायक म्हणती कर्ता ईश्वर॥ जीवा सन कळे स्वरूप अपार॥ तो हाच जाण [illegible]॥ ७४॥ प्रकृति पुरुष दोघे ऐक्यार्थ॥ सांख्यशास्त्र असे गर्जे

त॥ तो च हा क्षीराब्धीचा जामाता॥ द्रौपदीचा कैवारी॥ ७५॥ व्याकरणशास्त्री सप्तविभक्ती॥ नाना सूत्री
नामे साधिती॥ तो च हा कौंसांतक यदुपती॥ खिल्लारीं म्हणती नंदाचा॥ ७६॥ अष्टांग योगादि साधन॥
पातंजली शास्त्रीं हेच कथन॥ तो योग साधुन पावावें चरण॥ याचें च जाण पंडुसुता॥ ७७॥ शैव या
स चि म्हणती सदाशिव॥ वैष्णव मानिती नमाधव॥ सौर म्हणती सविता स्वयमेव॥ तो हा माधव
जाण पां॥ ७८॥ गाणापत्य म्हणती गणेश॥ तो हा जाण द्वारकाधीश॥ शाक्त म्हणती शक्ति विशेष॥
धत्रीमायां विलास तो च हा॥ ७९॥ संतांचें हृदयजीवन॥ जो समरधीर दुष्टगंजन॥ उमचें हृ
ष्टी सोयरा पूर्ण॥ जगद्भूषण दिसे हा॥ ८०॥ दुर्जन दुराले पामर॥ ते यास कपटी म्हणती दुराचा
र॥ हा जगद्गुरु यादवेंद्र॥ जो मुरहर मधुसूदन॥ ८१॥ या श्रीकृष्णासि टाकुन॥ कोणाचें करिसी
येथें पूजन॥ ऐसें बोलतां गंगानंदन॥ सहदेवें पूजा सिध केली॥ ८२॥ अग्रोदकाचा आक्रून क
लस॥ षोडशोपचार जेजें विशेषें॥ पूजा वया आदिपुरुष॥ धर्मराज सिध जाला॥ ८३॥ सुगंध

चंदनपात्र घेउनी॥उभा ठाकला भीमसेना॥सुवास पुष्पमाळा धरून॥पार्थ उभा आवडी॥८४॥हीर
याची चवाई आदळ॥लाहे लाहे घालीन कुळ॥वरी क्षीरोदकवसन निर्मळ॥घडी घातली तयाची॥८५॥
धर्म ह्मणे श्रीरंगा यदुकुळटिळका॥या चौरंगावरी बैसावें मन्मथजनका॥भक्तवत्सल वैकुंठना
यका॥कर्ममोचका मुरारी॥८६॥पुढील कार्य जाणोन सत्वर॥आग्रह न करी च श्रीधर॥पूजा
सनी बैसला यादवेंद्र॥जयजयकार जाला॥८७॥प्रतिबंध्या द्रौपदीकुंचें मर॥वेगें धरिती छ
त्रचामर॥वालयाचे विंझणे सुखकर॥दोहीकडे वारिती॥८८॥सुभद्रेचा पुत्र अभिमन्यो॥उभा
ठाके पादुका घेउनी॥भीष्मा विदुर आवघे भक्तजन॥उभे ठाकले आवडी॥८९॥वैष्णव कीर्त्तन क
रिती॥हरिरंगी आनंदे नाचती॥विष्णुचरित्रे अद्भुत गाती॥टाळ्या वाजविती आनंदे॥९०॥
विमानी पाहती सुरवर॥वर्षती सुमनांचे संभार॥सनकादिकांचे नेत्र॥प्रेमजळ पूर्ण भर
ले॥९१॥नानावाद्यांचे गजर होत॥बंदीजन यदुवंश वर्णिती॥शोडशोपचारें यिदिसाकांत॥धर्म

पूजीतते वेळे ॥ ९२॥ हरिचरण धरून हातीं ॥ प्रेमें स्याली धर्मनृपती ॥ ते थून जान्हवीची उत्पती ॥ सदा
तळ्हाती सिंधुकन्या ॥ ९३॥ मधुकैटभ संहारण जाण ॥ ज्ञानें विवळ खिजेल निर्गुण ॥ त्यापरीस गोड सगु
ण ॥ भक्तांलागी अवतरलें ॥ ९४॥ जो पुराणपुरुष परात्पर ॥ तो आनकदुंदुभीचा कुमार ॥ हे रंभजननी
चा वर ॥ हृदयीं ध्यायेतयातें ॥ ९५॥ केवळ ब्रह्मानंद मुसोन ॥ मूर्त्ति वोतली हो सगुण ॥ स्मृतीसीही नव
र्णवे पूर्ण ॥ बुडे मन करणेसहीत ॥ ९६॥ तो अळंकारें मंडित पूर्ण ॥ किरीट कुंडल सुहास्यवदन ॥ कृ
पाकटाक्षें करून ॥ निजभक्तां न्याहाळी जो ॥ ९७॥ कपाळीं मृगमदाचा टिळक ॥ आंगी केशरी उटी
सुरेख ॥ वैजयंति वें तेज अधिक ॥ हृदयपद्क सळ्कतसे ॥ ९८॥ मनोहर पीतवसन ॥ मुक्तलग
पदर विराजमान ॥ उतरीवस्त्र झळ्के पूर्ण ॥ जे विचपळा निराळी ॥ ९९॥ चरणीं बीदे तोडर झ
ळती ॥ असुरावरी गजर करिती ॥ ऐसा तो यादवेंद्र जगत्पती ॥ धर्मराज पूजीतया ॥ २००॥
श्रीकृष्णमूर्त्ति पाहतां ॥ सहस्त्रवदन सीणला तत्वतां ॥ वेद भागलें गीती गातां ॥ पंडुसुत पूजीत

॥११॥

या॥ १॥ वेदशास्त्रग्रंथविलोकुन॥ ज्यांचें सीणलें सदा नयन॥ त्यांनी श्रीकृष्णमूर्त्ति पाहोन॥ ब्रह्मानंदें डुल्लती॥ २॥ जें वैराग्य जालें तप्त॥ जें तीर्थें हिंडती विरक्त॥ ते ही देखतां द्वारकानाथ॥ श्रमरहीत जालें॥ ३॥ जप तप अनुष्ठान॥ कर्मकुशल करिती यज्ञदान॥ जे येकांत गुहा बैसलें सेउन॥ ते ही हरिरूप पाहोन निवाले॥ ४॥ हे लावण्यसौंदर्यसमुद्र॥ की आनंदाचा लोटला पूर॥ की श्रीरंग देखोन पूर्णचंद्र॥ भक्ताचकोर वेधले॥ ५॥ तो वैकुंठीचा नृपवर॥ ब्रह्मण्यदेव अति उदार॥ जो ब्रह्मादि देवांचें माहेर॥ जो अवतार ईश्वराचा॥ ६॥ कोट्यान कोटि मीनकेतन॥ नखावरून सांडावें वोवाळुन॥ याचें आपले हातें पूजन॥ पंडुनंदन करीतसे॥ ७॥ वस्त्र भूषण अलंकार॥ अर्पिले सोळाही उपचार॥ करणीसहीत मन सकुमार॥ सुमनें चरणी समर्पिली॥ ८॥ डोळे भरून हरी पाहिला॥ तैसाच हृदई मग रेखिला॥ जैसा निवतिस्थानी दीप ठेविला॥ तो कदापी न हालवे॥ ९॥ जैसा पूजिला यादवेंद्र॥ परी दुर्जन क्षोभले समग्र॥ आतां शिशुपाळाचें सिर॥ उडविलें साचार श्रीकृष्णें॥ १०॥ शतशिव्या देईल स

॥१२॥

मेआंत॥ सेवटीतयास मोक्ष प्राप्त॥ ते सुरस कथा पंडीत परिसोत॥ अयादरे करूनियां॥ ११॥ श्रीधरवरद ब्रह्मानंद॥ जो अभंग अक्षय आगाध॥ तो हरिविजयी जगदंकुरकंद॥ विराजे सदा स्वानंदे॥ १२॥ ॥ इति श्रीहरिविजयग्रंथ॥ संमत भागवत आणि भारथ॥ सदा परिसोत साधुसंत॥ चतुःस्त्रिंशोध्याये गोड हा ॥ २१३॥ ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥

॥१२॥

श्रीगणेशायनमः॥ ॥श्रीशारदायनमः॥ ॥श्रीगुरुभ्योनमः॥ ॥श्रीसच्चिदानंदमूर्त्तिब्रह्मणेनमः॥ ॥श्रु
भमस्तु॥ ॥माझेंहृदयदिव्यकमळ॥जेंतेजोमयपरमनिर्मळ॥अष्टकर्णिकाअतिकोमळ॥मध्येघननीळ
विराजे॥१॥हृत्सद्मामध्येगरुड देखा॥श्रीरंगनादें भक्तसखा॥आष्टकर्णिकावरीअष्टनायका॥याहीस्थापु
निजध्यानी॥२॥रुक्मिणीजांबुवतीसत्यभामा॥कालिंदीमित्रविंदामनोरमा॥यज्ञजितीलक्ष्मणापूर्ण
कामा॥मंद्रावतीआठवी॥३॥मध्यभागीश्रीकरधर॥कर्णिकावरीनायकासकुमार॥ऐसाहृदयकम
ळीयादवेंद्र॥सर्वदाहीपूजावा॥४॥चौतीसावांअध्याईकथाजाण॥धर्मेंअग्रपूजादिधलीश्रीकृष्णा
तेणेंक्षोभलादुर्जन॥शिशुपाळादिकासी॥५॥चैद्यआणिकौरव॥येकेसभेसीबैसलेंसर्व॥क्षुद्रदृ
ष्टिलक्षितीमाधव॥परमद्वेषीदुरात्मे॥६॥शिवलिंगदेवतादृष्टी॥परमक्षोभतीजैसेंकुजन॥कींप
तिव्रतेचीराहाटीपाहोन॥जारिणीजेविनिंदिती॥७॥कींदृष्टिदेखतांराजहंस॥कावळयासउपजे
अतित्रास॥कींपंचाननादेखोनसावकाश॥जंबुकासवाटेना॥८॥कींसभेंतदेखोनपंडित॥मूर्खम

॥१॥

ति मंद संतापत॥ की दृष्टि पाहतां समीरसुत॥ वाटे अनर्थ रजनीचरा॥९॥ की ऐकतां हरिनाम घोष॥ भूतप्रेतां उपजे त्रास॥ तैसें पूजितां श्रीरंगास॥ दुर्जन परमतापले॥१०॥ अंतरीचें कष्टी कौरवसं पूर्ण॥ परी वैद्यामाजि दमघोषनंदन॥ परम खवळला दुर्जन॥ काळसर्प ज्यापरी॥११॥ मी आसिह्मणे कुंतिनंदन॥ आतां कोणाचें करूं पूजन॥ गंगासुत बोलावें जोवचन॥ तो शुरु पाळु जल्पे मलतेंची॥१२॥ ह्मणारे धर्म ऐका वचन॥ तुह्मीनीच मूर्ख अवघे जन॥ गोरक्ष आधी पूजन॥ आपेश माथा घेतलें॥१३॥ योग्य आयोग्य विचार॥ मूढा तुं जनक ह्ले साचार॥ आग्र पूजेस अधिकारी जार॥ करितां पामर पांडव तुह्मी॥१४॥ दो येंजनक या गोरक्षकातें॥ पंचतात तुह्मां पांडवातें॥ यालागी दोघाची चित्त॥ ऐक्य जाली परस्परें॥१५॥ परम मूर्ख तुं युधिष्ठिरा॥ बुद्धि भ्रंश पावलागा कुमरा॥ पूजेसि अधिकारी तस्कर॥ केला साचार यज्ञपंडपी॥१६॥ ऋत्विज सांडून सत्यवतीकुमर॥ कपिल याज्ञवल्कि वशिष्ट ब्रह्मपुत्र॥ द्रोणहि पाचार्य गुरुवर॥ टाकून जार पूजियेला॥१७॥ धृतराष्ट्र सांडून वृद्ध॥ सोयरा

॥१॥

सांडून द्रुपद॥ कोण्या विचारें बुद्धिमंद॥ हा गोविंद पूजिला॥१८॥ अश्वत्थामा गुरुनंदन॥ पूजावा होता सूर्यसून कर्ण॥ पृथ्वीपती सुयोधन॥ सांडून कृष्ण पूजिला॥१९॥ भीष्मक बाल्हीक दृष्ट धीर॥ शैल्य एकलव्य भगदंत वीर॥ जयद्रथ शकुनी महाशूर॥ सांडून तस्कर पूजिला॥२०॥ पूज्य अपमान थोर थोर॥ अपूज्यासी पूजिलें साचार॥ येणें तुमचें येश कीर्ति पुण्य समग्र॥ बुडोन भ्रष्ट जाला॥२१॥ येणें काय केलें अनुष्ठान॥ कीं केलें जप तप व्रत साधन॥ किंवा येणें केलें जप तप व्रत साधन॥ किंवा येणें केलें वेदपठण॥ ह्मणऊन आधीं पूजिला॥२२॥ यांस ह्मणावें रायासमान॥ तरी नाहीं छत्र सिंहासन॥ आचार्य नव्हे हा ब्राह्मण॥ भ्रष्ट पूजन व्यर्थ केलें॥२३॥ आह्मी बैसलें असतां नृपवर॥ आधीं पूजिला पशुपालकुमर॥ आमची घ्राणें छेदिलें समग्र॥ परम पवित्र पांडवतुह्मी॥२४॥ पूजणें जरी होतें गोवळा॥ तुवां कृष्ण पुत्रा आमंगळा॥ आह्मास कां येथें आणिलें खळा॥ यज्ञ गेला वृथा तुझा॥२५॥ म्यां तुज दीधला करभार॥ कीं तुं दुर्बळ बहुत कष्ट पुत्र॥ धर्म ह्मणे यासा हे करावें सा

ये

॥२॥

चार॥ विवेकीनर बोलती॥२६॥ तुवां आप मानिलें नृपाळा॥ येथें थोर केला रे गोवळा॥ इतुकेन आह्मी नीचसकळु॥ सर्वथा हीन हें ची॥२७॥ यज्ञ पुरोडाश आरण्यांत पडिलों॥ तो येका जंबुकास लाधला॥ तितुकेने काय तो श्रेष्ट जाला॥ मृगेंद्राहूनि थोर पै॥२८॥ जैसी राजकन्या परमसुंदर॥ षंढाप्रति दीधली साचार॥ हिंसकास गोदान निर्धारि॥ दीधलें तुवां पंडुपुत्रा॥२९॥ जन्मांधासी दर्पण दाविला॥ शूकरासि ह्मासनी बैसविला॥ येणे जरासंद कपटें वधिला॥ कोण तो केला पुरुषार्थ॥२०॥ ऐसें बोलोन पापमती॥ स्वर्ग विसउन हाती॥ त्या पेउगरे आमचें सांगाती॥ जे असती लये समै॥२१॥ ऐसें बोलतां शुशुपाळु॥ तत्काळ उठिलें आवघे खळु॥ स्पष्टा देषी परम चांडाळा॥ आति कोल्हाळु करिती तेथें॥२२॥ धर्में धावोन तत्काळू॥ हृदईं कवळिला शुशुपाळू॥ ह्मणे तुं बंधु आमचा केवळा॥ यज्ञ हा सकळु तुझा असे॥२३॥ ऋषी तपस्वी वृधराजेंद्र॥ सृष्टा पूजितां यासआनंद थोर॥ तुही ह्मष्टा भजनीं सादरा॥ आनन्य होये शुशुपाळा॥२४॥ परम जाणतां गं

मापलें

॥२॥

गानंदन॥ तृधवडील सर्वांस मान्य॥ त्याचें आज्ञेने म्यां केलें पूजन॥ तुं कां दूषण ठेविसी॥ २५॥ तुज दूनजाणे पंडित॥ त्वष्टा पूजन तें आनंदत॥ तुज हृदईहा अनर्थ॥ काय ह्मणून प्रवेशला॥ २६॥ मी यथार्थ बोले वचन॥ परम दुष्ट हा दमघोषनंदन॥ याचें कासया करिसी शांतवन॥ यास मरण जवळि आलें॥ २७॥ कां याचें करिसी समाधान॥ कदांनमृनी लोतु झें वचन॥ जैसें प्रेतास वस्त्र भूषणे पूर्ण॥ काय लेवउन सार्थक॥ २८॥ मतिमंदापुढें ठेविलें शास्त्र॥ षंढा हातीं दीधलें शस्त्र॥ नसणी मंडपविचित्र॥ व्यर्थ जैसे उभविलें॥ २९॥ वायसासी अमृतफळें॥ कीं उष्ट्रासी समर्पिली केळें॥ कीं रासभा चीं अंगासी लेपिलें॥ मृगमदाचें उडगे हो॥ ४०॥ द्राक्षफळें अर्पिली शूकर॥ आदर्श दाविला जन्मांधसरा॥ कीं कीरपिसी समर्पिली शर्करा॥ तैसा यां पामरा बोधकाये॥ ४१॥ मद्य पात्रीजीवन॥ कां श्रमावें व्यर्थ विघालुन॥ दुग्धामाजि हरलें रांधुन॥ काय व्यर्थ विजाणपां॥ ४२॥ उकरडा वोतिला सुधारस॥ सुमनसेजे वरी निजविला हैस॥ दुग्धें न्हाणिला वायस॥ शुभ्रन

॥२॥

हें कदापी॥४३॥तैसी हासबुद्धी नधरी पामर॥जैसा तस्कर विटे देखतां निशाकर॥हिंसकास धर्म
शास्त्र॥कदांनावडे जाणपां॥४४॥आह्मी ज्यांचें केलें पूजन॥ज्यांस हृदयीं ध्यायई शान॥जलजोद्भ
वसहस्रनयन॥अनन्यशरण जयासी॥४५॥तो जगद्गुरु इंदिरावर॥जो प्रतापमित्र समरधीर॥
ऐसा को णआस पामर॥जें पूजा इच्छीयाआधी॥४६॥जो मदगजविदार कपंचानन॥सनकादिक
ज्यांस शरण॥तयास आह्मी पूजिला पूर्ण॥कां हा दुर्जन दुखवला॥४७॥जो अनंत ब्रह्मांड नायक॥
भोगेंद्र जालाया चा तल्पक॥जें पुराणपुरुषा निष्कलंक॥जगद्वंद्य अनादि जो॥४८॥हा येवढी आ
गळीक बोलत॥कोठें येणें केलीं पुरुषार्थ॥महागजदेखोन भुंकत॥श्वानजे विअनिवार॥४९॥
ऐसें बोलतां शांतनकुमर॥तोसहदेवास आवेश दाटला थोर॥जैसा कां गर्जे मृगेंद्र॥उमारा
होन बोलते वी॥५०॥आह्मी समस्तांनी निश्चित॥यथार्थ पूजिला वैकुंठनाथ॥असा हे मानितो
त्या वेंद्र जिस मस्त॥चरणातळीं माझिया॥५१॥जो श्री हृष्टासि निंदी दूर्जन॥त्याचीजिंव्हां

॥२॥

णछेदीन॥ राशमावरी बैसउनां॥ पिटीन जाण दिगांतरवरी॥ ५३॥ ऐसें सहदेव बोलतां आगल्हें॥
जयजयकार देव गर्जले॥ पुष्पांजुली वोपिते जाले॥ माद्रीपुत्रावरी तेव्हां॥ ५४॥ आकासी देववा
णी गर्जत॥ धन्य सहदेव कृष्णभक्त॥ नारद ह्मणे ऐकसमस्त॥ मोटा अनर्थ होईल तेथें॥ ५५॥
जे पोनिंदिला द्वारकानाथ॥ सासज वल्ही आला रे अनर्थ॥ तो प्रेतप्राय निश्चित॥ जननी वेर्थ
प्रसवली॥ ५६॥ ऐसें ऐकोन ते वेला॥ कुरुपाल अत्यंत क्षोभला॥ घेउन दुर्जना वामेल्हा॥
उगा ठाकला संग्रामां॥ ५७॥ ह्मणे आजि यादव पांडव आणिमी प्राकृ कृष्णासमवेत करीन भस्म॥
आव चें खल्ह मिलोन परम॥ कोल्हाल्ह करिती ते धवां॥ ५८॥ जैसा दृष्टि देखतां राजहंस॥ ए
कही कोल्हाल्ह करिती वायसा॥ युधिष्ठिर ह्मणे भीमास॥ कैसें आतां करणे जी॥ ५९॥ मग बो
ले गंगाकुमर॥ तुं स्वस्त राहे न सांडी धीर॥ कैसा तरेन मी सागर॥ कुंभोद्भव विचार करावा कां
॥ ६०॥ निश्चित हा श्रीरंग पंचानन॥ तवेंचि हे जंबुक करिती गर्जन॥ आरे हा धड धडीत हु

॥४॥

ष्णाळशानमदुर्जनकाननजाळिलें पैं॥ ६१॥ श्रीकृष्णावडवानळावरी॥ एकवेळे चैद्य उठिलें तृणाचें पुतळे॥ शुशुपाळ हा कपुरबळे॥ उठे धावंतो विझवावया॥ ६२॥ याराजोपरिकरसकळी॥ हीमेणाचीतैसीबाकुली॥ श्रीरंगहाज्वाळमाळी॥ भस्मकरील क्षणार्धें॥ ६३॥ ऐसें ऐकतां शुशुपाळ॥ क्रोधेंखवळला जैसा व्याळ॥ शाङ्गते विसांडी गरळ॥ मीभ्रसमोर लक्षुनियां॥ ६४॥ म्हणे रे भीष्मा दुष्टवृद्धा॥ परमहीनाबुधिमंदा॥ कपटियाआमचीकरितोसनिंदा॥ तुझी जिव्हा कां झडेना॥ ६५॥ कोणता कृष्णें केला पुरुषार्थ॥ म्हणोन जल्पसी सभेआंत॥ पूतना वृद्धस्त्री मारिली सत्य॥ म्हणोन वाटीव बोलसी॥ ६६॥ केसी एक अश्व मारिलें देख॥ कालियेअगासुर तरी शुक॥ बगासुर पक्षी एक॥ मारून जाला पुरुषार्थी॥ ६७॥ गोवर्धन तरी एक वाल्मीका॥ कपटी म्हणोन गिळील पावक॥ कपटें विकौस काळयोवनादिका॥ मारिलें येणें गोवळें॥ ६८॥ तस्करामाजि हा अतिश्रेष्ट॥ जारामाजि परमवरिष्ट॥ कपट नाटक परम॰ [illegible] ष्ट॥ स्वधर्मभ्रष्ट गोवळें॥ ६९॥

॥४॥

आरे भीष्मा तूं परम दुर्जन॥ कासीपतीच्या कन्या नेल्या हरून॥ यांत एक स्त्रीने दिधला प्राण॥ तुजवरीन पुसकां॥८०॥ स्नानसंध्या अनुष्ठान॥ यज्ञ तप दान देवार्चन॥ सर्व व्यर्थ गेले तुझें वदन॥ संतानहीना पाहू नये॥८१॥ लोकास निरोपिसी धर्म॥ मूढा तूं च करिसी अधर्म॥ जैसी जैक तां भीम॥ गदा झाडवरून सरसावला॥८२॥ जैसा केवळ खदिरांगारा॥ तैसें आरक्त दीसती नेत्र॥ ह्मणे हे दुर्जन अपवित्र॥ चूर्ण करीन गदाघायें॥८३॥ भीष्में धरून भीमाचा हस्त॥ ह्मणे क्षण एक तुं राहे स्वस्त॥ याचें आयुष्य उरलें किंचित॥ जवळी अनर्थ पातला॥८४॥ ऋतुपर्णा भीष्मासी ह्मणे अवरी॥ सोडी भीम येउं दे मज वरी॥ जातवेद पतंगास भस्म करी॥ तैसें करीन निर्धारें॥८५॥ कृष्ण भीम अर्जुन॥ तीघे एकदांच येउं दे शस्त्र घेउन॥ विलंब करितां षंढ पूर्ण॥ नाम तुझें निर्धारें॥८६॥ ऐसी दुष्ट उत्तरें बोलत॥ तों क्षमा करून गंगासुत॥ भीमास ह्मणे जैक वृत्तांत॥ पूर्वींचा तुज सांगतो॥८७॥ दमघोषाची पत्नी सावती॥ ते वसुदेवास भगिनी होये नि

निंदा

क्षिती॥ तीचें उदरीं हा पापमती॥ शिशुपाळ उपजला॥ ७८॥ उपजतां बाळ पाहे जननी॥ तो भुजा
वरी भुजा दोनी॥ कपाळीं नेत्र अवगुणी॥ हा पापखाणी उपजला॥ ७९॥ लोक ह्मणती हे अवचि
न्ह॥ माता ह्मणे टाका बाहीर नेऊन॥ तो आकाशीं देववाणी बोले वचन॥ नटाकी बाळ सर्वथा॥ ८०॥
हा होईल महाभूपती॥ शिशुपाळ नाव ठेवी याप्रती॥ माता विस्मित जाली चित्तीं॥ काय पुढती बो
लत॥ ८१॥ कोणाच्या हातें यास मृत्यु॥ हे देवदूता वदे निश्चित॥ तो आपणीक प्रतिध्वनी होत॥ मा
यें ऐकत सादरें॥ ८२॥ ज्यां पुरुषाचें दृष्टि करून॥ दोन्ही भुजा आणि तीजा नयन॥ खाले पडती ल
गलेन॥ यासि मरण त्याहातें॥ ८३॥ ऐसें बोलोन आकाशवाणी॥ गुप्त राहिली तयेक्षणी॥ मग बाळ चे
तीजां की जननी॥ विरूप नेत्र चतुर्बाहु॥ ८४॥ देशोदेशीचे भूपती॥ बाळ पाहावयालागीं येती॥ प्रति
तविलोकावयासा हती॥ शिशु देत सर्व पुढें॥ ८५॥ तो बळिभद्र आणि घननीळ॥ तेही पाहावया आले
बाळ॥ बंधुपुत्र देखतां तुंबळ॥ आनंद जाला साहितीतें॥ ८६॥ तो शिशुपाळ आणि वक्रदंत॥ दोघे ह

॥५॥

ष्णापुढें आलें रंगता ॥ कृष्णां दृष्टि पडतां आकस्मात ॥ कुजा गाह्रोन पडिली यां ॥ ८७ ॥ कपाळीचा जो नयन ॥
तत्काळचि गेला जिरोन ॥ मातेसि चिंता दारुण ॥ प्राप्त जाली तेधवां ॥ ८८ ॥ मग हरी पुढें पदर पसरुन ॥ पितृभगि
नी मागे पुत्रदान ॥ ह्मणे यास तुं न मारी ह्मणउन ॥ भाषा देई मज लागी ॥ ८९ ॥ श्रीकृष्ण बोले साच वचन ॥ श
त अपराध क्षमा करीन ॥ अधीक जालें यां बोलवीन ॥ मोक्षसदना निर्धारें ॥ ९० ॥ ऐसें बोलतां गोविंद ॥ मा
तेसि जाला आनंद ॥ ह्मणे हा कासया करील सतें अपराध ॥ मग रामनुकुंद बोलविले ॥ ९१ ॥ यालागी ऐ
कमी मा निश्चित ॥ या शत अपराधाचें होत गणीत ॥ यालागी श्रीकृष्णा निवांत ॥ वाट पाहात समयाची ॥ ९२ ॥
हा शुशुपाळ आणि वक्रदंत ॥ पूर्वीच महाराक्षस उन्मत ॥ रावण कुंभकर्ण निश्चित ॥ रामावतारी वधि
लेंते ॥ ९३ ॥ येणे पूर्वीं येउन मिथुळेसी ॥ धाविला वरावयासी तेसी ॥ भर्गचापनु चले मानसी ॥ परम खे
द पावला ॥ ९४ ॥ तोच हा शुशुपाळ पापखाणी ॥ वरावया धाविला रुक्मिणी ॥ तेथें पराजय पावला रणी ॥
जरासंदासमवेत ॥ ९५ ॥ तोच द्वेष धरुन मनांत ॥ दुर्जन कृष्णा निंदा करीत ॥ परी शत अपराध आले

॥६॥

भरत॥जवही अनर्थ यां सबाला॥९६॥ ऐकतां भीष्माचें सवर्मवचन॥ क्रोधें धडकला दमघोषनंदन॥ जै
सा स्नेहसिं पिता कृशान॥ अधिकाधिक प्रज्वळे॥९७॥ह्मणे रे बंदीजनानपुसका॥ किती रे वानिसी गोरक्षका॥
जें जें येथें रत्न वनासी योग्य देखा॥ न वानिसी तयातें॥९८॥ चोर जार कपटी केवळ॥ बकुत माजला हा गो
वळु॥ गोकुळचों टाळिलें सकळु॥ कपटी खळ आमंगळ हा॥९९॥ जालंधराची पत्नी वृंदा सती॥ येणे
तें भगिनी मानिली होती॥ तीसी चनात ला निश्चिती॥ नभिये चित्तीं पापासी॥१००॥ परदारा आणि कपटी॥ गमनी
यासमान नाही दुजा सृष्टी॥ ऐसियाची काय सांगसी गोष्टी॥ वारंवार मूढा तुं॥१॥ मग ह्मणे उठा रे आव
घेंजण॥ आधी वेढुं या भीष्माचा प्राण॥ तिळप्राय कुटके करून॥ येथेंच या रे टाकावें॥२॥ याज्ञी कर्मि
होन मोवतें॥ यज्ञपशु वधिती मुष्टिघातें॥ तैसें वधावें या वृद्धातें॥ येणे आत्मा तें निंदिलें॥३॥ तेलय क
टाह तातउन परम॥ हा जितचि घाला वाच्यांत भीष्म॥ कां शस्त्रें तोडुन उत्तम॥ खंडे याची करावी॥४॥ मग
बोले गंगासुत॥ बोलिला बोल जो न करी सत्य॥ याचे पूर्वज समस्त॥ पचतील माहा नरकीं॥५॥ तुझी

॥६॥

यामाथाचा मुगुट॥ तो म्यां पदघातें केला पीष्ट॥ जरी बोलिलें वचन पष्ट॥ खरें करून दाविसना॥ ६॥ भीष्म
सिंह्यापुढें जंबुक समस्त॥ करितां युध्याची तुह्मी मात॥ वज्रधारा धगधगीत॥ तृणें करून खंडे केवी
॥ ७॥ आजा जयाचा जननी॥ तो सिंह्यासी भिडों पाहे रणीं॥ पिपलिका ह्मणे थडक हाणोनी॥ दिग्गज ख
लें पाडीन॥ ८॥ बहु उडोन आली कां॥ विदारून मारीन ह्मणे विनायका॥ मशक ह्मणे हाणोन धडका॥
मेरूमंदार डोलवीन॥ ९॥ घुगरड्या ऐसें वदन॥ ह्मणे पर्वत सगळा ग्रासीन॥ पतंग अग्नीस ह्मणे
तुज गिळीन॥ सूड घेईन खांडोवनाचा॥ १०॥ स्वतंतुसूत्रें करूनी॥ उर्णनाभि शंकिन ह्मणे घरणी॥
वृश्चिक अभिमान वाहे मनी॥ ताडून फोडीन वज्रातें॥ ११॥ मजपुढें काय आदित्य॥ ह्मणोन निंदा करी
खद्योत॥ मरणकाळीं होय शनिपात॥ तैसें तुज जालें रे॥ १२॥ काळमृत्यूची छाया पडिली॥ मृत्यु
वेळा जवळी आली॥ ऐकोन ऋतुपाळ तेवेळी॥ अधिक विभावे शला॥ १३॥ शस्त्र काढून वेगेंसीं॥
ह्मणे उत्तरे त्वष्ट्याजुं झमजसी॥ नपुंसका काय बैसला सी॥ लाज कैसी नुपजे तुतें॥ १४॥ तुझें रस

पोस भजणे दोन्ही ॥ मी शुशुपाल तृणप्रायमानी ॥ गोरक्ष कातु जआशुनी ॥ लज्जाकारन वांटे ॥ १५ ॥ उ
पजौनियां तुवां गोवला ॥ दृष्टी कुलासी डाग लाविला ॥ तुवां चोरून नेली रुक्मिणी वेल्हाला ॥ तेन व
री मासी निर्धार ॥ १६ ॥ रुक्मिणी आधी अर्पिली माते ॥ म्या मनी व भोगिले तैं येतें ॥ मग ते प्रास जाली
तु तें ॥ माझें उचिष्ट गुराखीयां ॥ १७ ॥ जैसें भोगिलें वस्त्र बहुत ॥ ते भाटास देती भाग्यवंत ॥ तैसी
रुक्मिण्यां भोगिली निश्चित ॥ तुज ते प्रास जाली ॥ १८ ॥ पुष्पहार भोगुन टाकिला ॥ तो भूपजैगेस
उचलुन नेला ॥ कीं रावणे चोरून नेली जनकबाला ॥ तैसी रुक्मिणी तुवां नेली ॥ १९ ॥ शाल्व पवि
त्र तुज परीस ॥ कदां नातले आंबेस ॥ नवरी जें नेमिली आणिकास ॥ ते सर्वथा न प्रणावी ॥ २० ॥ ज्यं
वानावें जें पात्र वाढिलें ॥ आणि कीं नेतां तें उचिष्ट जालें ॥ ते धर्म धर्मशास्त्री बोलिलें ॥ तुज नक
ळती कर्मभ्रष्टा ॥ २१ ॥ श्रीकृष्णा म्हणे रे दुर्जना ॥ महानिंदका दुष्टमलिना ॥ तुं अग्रपूजा इछितो
स हीना ॥ तरी आतांच घेई निर्धार ॥ २२ ॥ ऐसें बोलोन क्षीरधीजांरमण ॥ केलें सुदर्शना चें स्म

॥७॥

चरणा

रण॥ तवं ते अकस्मात येउन॥ कृष्णा हस्तकी संचरले॥२३॥ जैसा कल्पांतिचा आदित्य॥ तैसें सुदर्शन धग
धगीत॥ ते शिशुपाळावरी सोडिलें अकस्मात॥ वैकुंठनाथ तेधवां॥२४॥ तत्काळ शिशुपाळाचें छेदिलें॥
सिर॥ निराळपंथें उडालें सत्वर॥ मुखें गर्जना करी घोर॥ म्यांचयदु विरजिंकिला॥२५॥ सिर मागुती
उतरलें॥ ते श्रीकृष्णाजवळी पडीलें॥ अंतर्ज्योती निघाली तेवेळे॥ कृष्णामुखी प्रवेशली॥२६॥ बाह्य
सूर्यासारिखें तेज अद्भुत॥ ज्योति कृष्णहृदईं प्रवेशत॥ जैसें लवणजळी विरत॥ की गगनांत नाद
जैसा॥२७॥ सांडून जीवदशा संपूर्ण॥ शिशुपाळ श्रीकृष्ण॥ तें पद तत्त्व दीजायहार पोन॥ तै
साली नजाला॥२८॥ की पूर्णजळी जळबिंदु पडीला॥ तो माघारा नाहीपरतला॥ तैसा शिशुपा
ळ गोपाळ जाला॥ नाही उरला वेगळेपणें॥२९॥ हे वैकुंठीचे द्वारपाळ॥ जयविजैं निर्मळ॥ स
नकादिकीं शापिलें तत्काळ॥ दैत्ययोनी तेअवतरल॥३०॥ ते चहिरण्याक्ष हिरण्यकस्यप जाण॥
तेच जालें रावणकुंभकर्ण॥ तेचहें शिशुपाळ वक्रदंत पूर्ण॥ कृष्णावतारी जन्मलें॥३१॥ परम

य

मत्तकुरुकुपाळ॥ बळेंच हरिरूप जाला तत्काळ॥ हातीची वस्त्र आसडून नेबाळ॥ तैसेंच केलें यथार्थ॥२२॥
तीसरे जन्मी निश्चिती॥ कृष्णें दीधला आक्षयमुक्ती॥ हृदईं ठेविली अंतर्ज्योती॥ महाभक्त ह्मणउनि
यां॥२३॥ आसो जाला जयजयकार॥ विस्रप वर्षती पुष्पसंभार॥ दुष्ट पळाले समग्र॥ वक्रदंतासहि
तपें॥२४॥ कौरव अंतरी चिंताक्रांत॥ ह्मणती आमचें उणे पडीले बहुत॥ येकी आनंदे टाळिया वाज
वित॥ बरें जाले ह्मणउनी॥२५॥ ऐसा कुरुकुपाळ पावला निजधामा॥ पार्थप्रती निरोपी धर्म॥ ह्मणे
याचें प्रेत करी भस्म॥ जातवेदामाझारी॥२६॥ मग कुरुकुपाळाचें राजा जे होते॥ ते दीधले यावया पु
त्राते॥ धर्मराजें समस्त राजयाते॥ वस्त्र अलंकार समर्पिले॥२७॥ ब्राह्मण क्षत्री वैश्य शूद्र॥ आ
वघ्यास गौरवी युधिष्ठिर॥ पूजा मान पावोन समग्र॥ गेले नगरां आपल्यां॥२८॥ आवभृतस्नान
धर्में केलें॥ तेथें सकळजन सुस्नात जाले॥ सहपरिवारेंसी तेवेळे॥ श्रीकृष्णानि घातलें द्वारकेसी
॥२९॥ धर्मास ह्मणे कमलोद्भवपिता॥ आह्मांस निरोप देईं आतां॥ धर्में चरणी ठेविलें माथा॥ कं

ठ जाला सहीत ॥४०॥ धर्मराज प्रेमे फुंदत ॥ जा अैसें न ह्मणे चौवेसस ॥ पुढती लोकरी यावें ह्मणत ॥
धन्य भक्त धर्मराज ॥४१॥ भीम अर्जुन नकुल सहदेव ॥ तयासी पुसत वासुदेव ॥ कुंती द्रौपदी सुभद्रे
प्रती माधव ॥ स्नेहे आज्ञा मागतसे ॥४२॥ तव ती ह्मणती श्रीपती ॥ जेथें तुझी पदें उमटती ॥ तेथें आमुचें
मस्तक असो तनिश्चिती ॥ अैसें वकरी रमावरा ॥४३॥ हृदयांतुन आमुचा श्रीपती ॥ परतां जाऊन
को निश्चिती ॥ ज्यां ज्यां भूतां हती [illegible] ती ॥ तुझी स्वरुपी भासोत ॥४४॥ श्रीकृष्णास बोळऊनी ॥
पांडव परतोन आले सदनी ॥ जागृती सुषुप्ती स्वप्नी ॥ कृष्ण चिंतनी सादर ॥४५॥ राजसूय यज्ञ जा
ला समस्त ॥ द्वारकेस पावला वैकुंठनाथ ॥ तो पौंड्रक आणि वक्रदंत ॥ वेढा घालिती नगरातें ॥४६॥
शिवें दीधलें वरद विमान ॥ त्यांत वक्रदंत ॥ सैन्ये सहीत बैसोन ॥ द्वारकेवरी येऊन ॥ युध्ये करीत
शस्त्रास्त्रीं ॥४७॥ तो इतुक्यांत पावला जगज्जीवन ॥ तत्काळ सोडिलें सुदर्शन ॥ वक्रदंताचें ही सिर
[illegible]डुन ॥ आकाशपंथ उडविलें ॥४८॥ पौंड्रिकास हीत सेना समस्त ॥ हरीनें संहारिली तेथें ॥ अैसा

॥१॥

प्रतापकरून अद्भुत॥ दुष्टशस्त्रें ठेविली॥४९॥मुरवधिलें गुरुपाळ वक्रदंत॥ इतुकें नेआमचे आवतार हरुस॥ संपूर्ण जालें यथार्थ॥ यादवाचा सीमारितां॥५०॥आह्मांस शस्त्र धरणें नाहीआतां॥ उरलें जें दैस तहताता॥ तेसारथ्यकरूनी यांपार्था॥ हत्तीपुढें वधवावें॥५१॥जन्मेजयासरसांगे वैशंपायन॥ धन्यधन्य आवतार श्रीहरुष्ण॥ गोकुळी आपार दैत्यमारून॥ कंसवधिला मथुरेसी॥५२॥जरासंदसत्रावेळ त्रासिला॥ द्वारकावसविली अवलीला॥ नरकासुर मारून सहस्त्रसोळा॥ गोपीआणिल्या घरासी॥५३॥आतां श्रोतीहो वेंसावचित॥ पुढें छत्तीसावें अध्याये गोड बहुत॥ छत्तीसाव्यापासून हरिविजय ग्रंथ॥ संपूर्ण यथार्थ जालाहा॥५४॥जेसा मुगुटावरील मणी॥ तैसा छत्तीसाव्यैकाश्रवणी॥ हरिविजय हि रयाची खाणी॥ सज्जन जोहरी घेथेचे॥५५॥श्रीधर वरदा जगन्निवासा॥ ब्रह्मानंदा पंढरीशा॥ भक्तमानसराजहंसा॥ पुराणपुरुषा जगदंद्या॥५६॥ ॥इतिश्रीहरिविजयग्रंथ॥ संमत हरिवंश भागवत॥ सदापरिसोत ज्ञानी पंडित॥ पंचत्रिंशो ध्याय गोड हा॥१५॥ ॥१॥

॥छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥

श्रीगणेशायनमः॥ ॥श्रीशारदायनमः॥ ॥श्रीसच्चिदानंदगुरुवेनमः॥ ॥शुभमस्तु॥ ॥ॐ न
मोजगद्गुरुअवधूता॥परब्रह्माअपरमिता॥पुराणपुरुषाअव्यक्ता॥मायातीताअगम्या॥१॥आदिपु
रुषाविश्वंभरा॥अवयवरहितादिगंबरा॥सदानंदरूपानिर्विकारा॥आलयारामरूपानिधी॥२॥अ
मलरूपापरमगंभीरा॥ब्रह्मानंदापरात्परा॥सहजानंदाअगोचरा॥कल्याणवासाजगद्गुरु॥३॥पूर्णा
नंदअपरमिता॥दत्तात्रयाषड्विकाररहिता॥ब्रह्मानंदाज्ञानभरिता॥भीमातीरविलासिया॥४॥रुक्मि
णीहृदयाब्जमधुकरा॥दाक्षायणीवरप्रियामुरहरा॥पांडवकैवारियादीनोद्धारा॥शुशुपालांतका
श्रीपती॥५॥पंचेतीसावेंअध्याईकथापरिकर॥छेदूनाशुशुपाळाचेंसिर॥विजईजालाश्रीकरधर॥
धर्मरक्षकपरमात्मा॥६॥आतांछत्तीसावांबहुसुरस॥हरिविजयाचापूर्णकिलस॥भोजनाचेंसे
वटीगोडघास॥तैसाविशेषछत्तीसावा॥७॥छत्तीसावाअध्यायेग्रंथआघवा॥परीहामुगुटमणी
छत्तीसावा॥तोभक्तजनींपरिसावा॥प्रेमादरेंकरूनियां॥८॥द्वारकेसीनांदतांरुक्मिणीरमण॥तो

॥११॥

पुढें आलें सूर्यग्रहण॥ कुरुक्षेत्रास जावें ह्मणउन॥ निश्चये केली श्रीवल्लभे॥ ९॥ तो यां पूर्वीच बलिभद्र॥ गोकुळास पाठवीया द्वेंद्र॥ जो महाबळीया भोगेंद्र॥ धराधर आवतरला॥ १०॥ गोकुळास जाउन रोहिणी सुत॥ यशोदा नंद गौळी समस्त॥ त यांभेटला रेवतीप्राणनाथ॥ सौख्य अद्भुत समस्तां॥ ११॥ च्यारि मास परियंत॥ बलिभद्र राहिला तेथें स्वस्त॥ श्रीकृष्णाचा प्रताप अद्भुत॥ जाला तो समस्त सांगितला॥ १२॥ मथुरे हुन गेल्यां कृष्णनाथ॥ कोण कोण मारिले दैत्य॥ केशा अष्टनायका ज्याल्या प्राप्त॥ आणि सोळा सहस्त्र कामिनी॥ १३॥ ती चरित्रे मुळीहुन॥ सांगे बलिभद्र आपण॥ कैसा जाला राजसयज्ञ॥ कां शुशुपाळु मारिला॥ १४॥ ती चरित्र ऐकता श्रवणी॥ तटस्त होती गोळिणी॥ ह्मणती ऐसा पुराणपुरुष चक्रपाणी॥ कैं आह्मा लागुनी भेटेल॥ १५॥ बलिभद्र वनास नित्य जाये॥ विलोकी हरीच क्रीडा गये॥ कुंजवनी क्रीडा केली पाहे॥ गडी समवेत हलधरे॥ १६॥ तो माध्यानास आला रउद्रिण॥ जलक्रीडा करुं इच्छी संकर्षण॥ तो यमुना दुर होती तेथुन॥ ती सरेवतीरमण बोले

॥११॥

वी॥ १७॥ म्हणे बैली कडे येसी सूर्यनंदिनी॥ तो ते गाहे निजछंदें करूनी॥ बलिरामक्षोभला ते वक्षणी॥
नागर घालूनी वोढिली॥ १८॥ वोघ मुरडून सगला॥ आपणाकडे रामें आणिला॥ गगनी देव पाहाती
डोला॥ नवल गोपाला वाटतसें॥ १९॥ जेह्ल क्रीडा करून बलिभद्र॥ गोकुलास आला सहर॥ च्यारि
मास जाल यां हलधर॥ जाता जाला द्वारके॥ २०॥ संपूर्ण गोकुलादें वर्त्तमान॥ कृष्णास सांगे रेवती
रमण॥ तो पुढें ग्रहण यात्रे सी जगज्जीवन॥ निघतां जाला कुरुक्षेत्रा॥ २१॥ निघाले छपन कोटिया
दव॥ उग्रसेन बलिभद्र वसुदेव॥ प्रद्युम्न अनिरुध अक्रुर उधव॥ सांब भानु मंत निघाले॥ २२॥
रुक्मिणी सहीत अष्ट नायका॥ निघाल्या सोला सहस्त्र गोपिका॥ च्यातुरंग दल देखा॥ सिधजे
ले ते कालीं॥ २३॥ लागले वाद्याचे गजर॥ असंभाव्य चालिला दल भार॥ कृष्णा नायकास मग्र॥
सुखासनी आरूढल्या॥ २४॥ रेवती देवकी रोहिणी॥ सत्यभामा कालिंदी रुक्मिणी॥ ज्याचियाव
हना पुढें कनक वेत्रपाणी॥ लक्ष्यावधी धावती तेव्हां॥ २५॥ बलीने चालती पर्वत॥ तैसे गजभा

रे येतां डोलत ॥ त्यावरी यादव बैसले रणपंडित ॥ कृतांतही जीत जयाते ॥ २६ ॥ पुढें चालती पायभार ॥
माचे तुरंग चालती सत्वर ॥ त्याचे पाठी माचे कुंजर ॥ कीकाट करीत जाताती ॥ २७ ॥ ते श्रीकृष्णाचे म
द्र जाती ॥ शुंडादंड ऊर्ध्व करिताती ॥ वाटे आकाश कवळुं पाहाती ॥ हीरे दांती जडियले ॥ २८ ॥ त्या
चे पाठी माचे रथाचे भार ॥ निजरथी विराजे यादवेंद्र ॥ जो कोटि अनंगाहून सुंदर ॥ लावण्यसा
गर श्रीहरी ॥ २९ ॥ देशोदेसीचे नृपती ॥ निजभारेसी सवें चालती ॥ दाटी जाली हरी भोंवती ॥ वारी
नसे दर्शना ॥ ३० ॥ राजयांचे मुगुट रत्नजडीत ॥ त्यास हीत कृष्णापदें नमीत ॥ एकास एक मु
गुट आदळत ॥ रत्ने विखरत सभोंवती ॥ ३१ ॥ जैसा सौदामिनीचा एक मेळ ॥ तैसे मुगुट दिस
ती तेजाळ ॥ पाहावयालागी घननीळ ॥ मुडपच सणी होतसे ॥ ३२ ॥ निजभारेसी कौरव पां
डव ॥ तेही येते जाले सर्व ॥ भीष्म द्रोण मकराव ॥ विदुरही पातला ॥ ३३ ॥ तो इंद्रादिक देवते स्व
र्णी ॥ पाहो इछिती चक्रपाणी ॥ तो हरी भोंवती नृपांची दाटणी ॥ वारी दर्शनी नव्हेची ॥ ३४ ॥

॥२॥

पाहावया हरिवंदनचंद्र॥ सर्वांचे नेत्र जाले चकोर॥ योगी तापसी मुनेश्वर॥ तेही मुरहर पाहों येती॥२५॥ आसोइत क्रियासमवेत मुरारी॥ येऊन उतरले कुरुक्षेत्री॥ सिंवीरे उभी केली ते अवसरी॥ सोळा सहस्त्र पृथक् पृथक्॥२६॥ पुढें लक्षून जान्हवीतीर॥ निज भारें उतरले नृपवर॥ तो पूर्वीच कृष्णादूत सत्वर॥ गोकुळास धाडिला होता॥२७॥ यशोदा नंद गोपिका गोळी॥ यात्रेसी पातली ते वेळीं॥ बोळपणीचें सवंगडी सकळीं॥ येते जाले हरिदर्शना॥२८॥ आसंख्य गोळी आनंदे करून॥ निघाले गोरस कावडी भरून॥ पुढें गोपाळ पावे घेउन॥ आनंदे करूनी नाचती॥२९॥ मृदांग टाळ घमडी चीघाई॥ मोहऱ्या चुमऱ्या वाजे सनाई॥ हरीची बाळलीळा गाती नवलाई॥ येती लवलाही गोपाळें॥४०॥ नाना रंगाची घोंगडी॥ पांघुरलें श्रीरंगाचे गडी॥ एक नाचती कडोविकडी॥ हासती घडि घडी आनंदें॥४१॥ श्रीकृष्णास जाणविती दूत॥ कीं गोकुळवासी आले समस्त॥ श्रीनिवास जाला आनंदभरीत॥ वेगें सांगत रुक्मिणीसी॥४२॥ माझी मातापित्र व्यदो

न्ही॥बाळमित्र आलें गोकुळींहुनी॥मज तें बहुत आवडती रुक्मिणी॥बळिरामाहुनी अधीक॥४३॥रु
क्मिणी सहीत कृष्णप्रियासमग्र॥सिध जाल्या पाहावया सत्वर॥गोळियास यादवेंद्र॥कैसा भेटतो
ह्मपाउनी॥४४॥तो लक्ष्यानुलक्ष गाडे॥गोळियाचें धावती वेगाडे॥वरी गोपिका बैसल्या निवाडे॥
हरीलीला गातयेती॥४५॥तो हरीचें सवंगडे समग्र॥ते पुढें आलें गोपाचें भार॥त्यास सन्मुख जाला
यादवेंद्र॥हरि नायकास मग्र पाहाती॥४६॥घवघवीत देदीप्यमान॥गोपानी देखिला जगज्जी
वन॥समस्ती घातलें लोटांगण॥प्रेमेकरून फुंदती॥४७॥ति तुक्यास ही केवल्यदानी॥भेटे ते
व्हां प्रेमेकरूनी॥गोपाळ ह्मणती चक्रपाणी॥तुझी करणी कळली आह्मां॥४८॥तुझी बाळपणी
हून प्रकृती॥आह्मास ठाउकी जगत्पती॥आमचें मनी चोरून निश्चिती॥घेउन श्रीपती गेला
सि तुं॥४९॥तुं परम नाटक कवित चोर॥तुझा विश्वास नाही अणुमात्र॥तुज भाग्य आलें थोर॥
बाळमित्र विसरलासी॥५०॥आमुचें संगतीने जगज्जीवना॥गाई राखिल्या तुवां मनमोहना॥

तुं यशोदेच्या तान्हा॥ आल्हीकान्हा ह्मणउन बाळुं॥५०॥ गाई नाखवतो हृषीकेसी॥ तुं आल्हासां गातेजे
विसी॥ आमच्यासि दोन्या ठकूनखासी॥ नलाजसी तो चिकीतूं॥५१॥ कृतु तुह मामा कूमली॥ आह्म
सी चालिसी वनमाळी॥ तुजबुक्यांवरी सकळी॥ डाई आलया मारूं कोडे॥५२॥ ह्मष्णा तुं मोटा चोर हो
सी॥ घरोघरीचें गोरस कढिसी॥ तुज मायेने बांधलें उखलेसी॥ तुज आठवते की हृषीकेशी॥५३॥
ह्मष्णा तुज भाग्य आलें थोर॥ ये ह्मवी तुं नंदाचा किशोर॥ तुझ्या गोकुलीच्या खोडी समग्र॥ नवणवि
तीशेषतें॥५४॥ वांसुरे चारितां गोविंदा॥ वलसां नेंदिसी तुं कदां॥ मग तुज आह्मी मारूं मुकुंदा॥
तैं तुज आठवते कीं॥५५॥ आमच्यासि दोन्या एकत्र करूनी॥ काल्हां वाटिसी तुं चक्रपाणी॥ तैं तुं आंबी
ल ताक घट चडुनी॥ पीत होता गोपाळा॥५६॥ आतां बहुत जाला सस्य कुमारा॥ ते विसरला सतुं रे
समग्र॥ आरे तूं परम होसी निष्ठुर॥ मायां अणुमात्र नाही तूतें॥५७॥ तैं तुझ्या आंगास मारवेसेण
आतां चर्चिला उत्तम चंदना॥ तैं धांवसी घोंगडी पांघरोन॥ पीत वसन आतां शल्हके॥५८॥ तैं मये

॥४॥

रपीचे सिरी शोभत॥ आतां रत्नजडीत किरीट विराजत॥ ते गुंजाचे हार गळां शोभत॥ आतां कौस्तु
भ पदके झळाळिती॥५९॥ तैंच तुं विसरलास गोपाळा॥ आतां भाग्य आलें घननीळा॥ ऐकतां कृ
ष्णनायक वेल्हो वेल्हां॥ हासती रुक्मिणी सहीत॥६०॥ एक गोपाळ म्हणे हषीकेसी॥ जैं तुं काळ
याचे डोहीं बुडालसी॥ आह्मी बहुत घेगायासमयासी॥ हरीकेला तुजकारणे॥६१॥ आमुचा
गुल्य ऐकतां मेणे मेणे॥ मग तु जसोडिले काळ्याने॥ आह्मी तु जवां चविले प्राण॥ ऐकतां कृष्ण
हास्य केले॥६२॥ शिळाधारी इंद्र वर्षला॥ आह्मी च मग गोवर्धन उचलिला॥ तु वांलटकी चर्मां
गोळी गोपाळा॥ लाउनगकिसी आह्मा ते॥६३॥ ऐसा सौंगडीयाच्या गोष्टी॥ ऐकतां तो षलाजग
जेठी॥ तो आल्या गोकुळीच्या गोरटी॥ देखिल्या दृष्टी कृष्णानाथें॥६४॥ परम सुंदरा लावण्यखा
णी॥ किंवा उतरल्या सौदामिनी॥ किंवा आल्या स्वर्गहुनी॥ देवांगना साक्ष्यांत॥६५॥ तटस्त पा
हाती कृष्णनायका॥ म्हणती धन्य गोकुळीच्या गोपिका॥ परम सकुमारा लावण्य रूपिका॥

॥४॥

वैकुंठनायका भालल्या॥६६॥ आसो गोकुळीं यायुवती॥ कृष्णाचरण दृढ धरिती॥ सप्रेम कृष्णासी भे
टती॥ प्रेम चित्तीं न समाये॥६७॥ म्हणासी वेधका वनमाळी॥ आह्मां सांडून गोकुळीं॥ तुह्मीं द्वारका वसविली
नाहीं दीधली भेटि कदां॥६८॥ आसो गोपींचें करून समाधान॥ गौळियांस भेटला श्रीकृष्ण॥ तो नंद य
शोदा दुरी देखोन॥ धावोन चरण हरी धरी॥६९॥ तो पुराण पुरुष जगपालका॥ यशोदे चपदीं गेविमस्त
क॥ येरी च हरीचें घरून मस्तक॥ क्षेमालिंगन दीधलें॥७०॥ यशोदेचें पयोधर॥ तेथें पान्हा फुटला सत्व
र॥ आती लक्षमृत क्षीरधी जीवर॥ बाळ पणीं याला आसे॥७१॥ यशोदा ह्मणे राजीवनेत्रा॥ निरा
ळ वर्ण कोमळ गात्रा॥ मज सांडून सकुमारा॥ बहुत दिवस गेलासी॥७२॥ कृष्णा तुज विण एक क्षण॥
जाला आह्मांसी युगा समान॥ हे रीतुझी बाळुली ह्या आठऊन॥ आह्मीं प्राण धरियेले॥७३॥ उखळीं तु
ज बांधलें हृषीकेसी॥ ह्मणून मज वरी रुसलासी॥ मज टाकून परदेसी॥ तूं द्वारकेसी वसतोस॥७४
श्रीकृष्ण ह्मणे जननी लागुन॥ तुह्मा पासी माझें लागलें मन॥ तो नंद आला जवळी धावोन॥ कृष्णा चर

॥५॥

णवंदिले ॥ ७५ ॥ जो कमलोद्भवाचा जनिता ॥ तेणें आलिंगिला नंदपिता ॥ ह्मणे सखया श्रीकृष्णनाथा ॥ दुरी
सांडिलें आह्मातें ॥ ७६ ॥ असो हातीं धरून नंदयशोदेसी ॥ आणिली वसुदेवदेवकीपासीं ॥ प्रेमालिंगनें ये
कमेकासी ॥ प्रेमादरें देती तेव्हां ॥ ७७ ॥ तो अष्टनायका आलियां धावोनी ॥ आणि सो[illegible]नितंबिनी ॥ दंड
लागती यशोदेचे चरणीं ॥ नंदराणी भेटे सातें ॥ ७८ ॥ सोळा सहस्रांमाजि पट्टराणी ॥ लावण्यखाणी ॥ मन्म
थजननी ॥ तीनें यशोदेचे चरणीं ॥ मस्तक ठेविला आदरें ॥ ७९ ॥ यशोदेनें रुक्मिणी हृदयीं धरिली ॥ आनं
दनसमाय दिग्मंडली ॥ जैसी कौसल्यानें सीता आलिंगिली ॥ तैसीच जाली रीति येथें ॥ ८० ॥ असो यांवरी
ग्रहणी करून स्नान ॥ श्रीकृष्णें केलीं यथासांग दान ॥ आनकदुंदुभी उग्रसेन ॥ भिन्नभिन्न दानें देती ॥ ८१ ॥
आमर्याद भांडारें फोडुन ॥ सुखी केले याचकजन ॥ याचकाचें सदा तृप्त मन ॥ हरीवदन पाहतां ॥ ८२ ॥
गोकुळीचें जें जें जन आले ॥ तितुकें श्रीकृष्णें गौरविले ॥ दिव्य वस्त्राभरणीं तेव्हां ॥ पूजिलें गोवळ
गोपाळ ॥ ८३ ॥ रुक्मिणी ह्मणे यादवेंद्रा ॥ बंधुची बरवी पूजा करा ॥ माझा हेत आजि पुरला खरा ॥ सर्व

॥५॥

गडे तुमचें पाहोनियां ॥ ८४ ॥ दिव्य वस्त्रें अलंकार तेजागळे ॥ गोकुळीच्या गोपिकासी तेवेळां स्वहस्तें दीधली
चननीळ ॥ देखतां हांसे रुक्मिणीसी ॥ ८५ ॥ श्रीकृष्णास ह्मणे तेवेळां ॥ बरव्या गौरवाजी गोपबाळां ॥ आ
पुली पूर्वील खीसां आला ॥ केला जो सोहळा बाळपणीं ॥ ८६ ॥ ऐकतां रुक्मिणीचिया वचना ॥ हांसे आ
लें जगन्मोहना ॥ सत्यभामादि शोडशसहस्त्र ललना ॥ हांसती तेव्हां आनंदें ॥ ८७ ॥ नंद यशोदेचें पूज
न ॥ आपण करीत श्रीकृष्ण ॥ बहुत अलंकार वस्त्रें धन ॥ नंद यशोदे समर्पिलें ॥ ८८ ॥ कृष्णनायकास
मग्र ॥ यशोदेसी देती वस्त्र अलंकार ॥ श्रीकृष्णाचें पुत्रपौत्र ॥ यशोदेसी भेटले ॥ ८९ ॥ देवकी ह्मणे य
शोदे लागुन ॥ तो देखिले हरीचें बाळपण ॥ कृष्णास करविलें स्तनपान ॥ तुंच धन्य त्रिभुवनीं ॥ ९० ॥
कौसें अपटिली साहा बाळ ॥ कृष्णाचें ऐसी सुंदर सकळ ॥ सांगतां देवकीसी रुदन आलें ॥ दुःख आठ
वले बंदिशाळेचें ॥ ९१ ॥ देवकी ह्मणे यदुविरा ॥ तुवां गुरुपुत्र आणिला माघारा ॥ तुजहुन जेष्ठ साकु
मारा कौंसें पूर्वी मारिले ॥ ९२ ॥ तेमजे मोसें आणुनी ॥ सहर भेटवी चक्रपाणी ॥ मग बोले केवल्यदानी ॥

आरव

॥६॥

देवकीप्रतीतेधवां॥९३॥मातेपाहेआतांचनवल॥तुजभेटविलोसाहीबाळ॥यमासअद्यापीघननीळ
तेणेतत्काळआणिले॥९४॥साहीबाळेंआणुनी॥देवकीपुढेंदेतमोक्षदानी॥आश्चर्यकरितीदोघीजन
नी॥देवकीआणियशोदा॥९५॥साहीबाळेंतेवेळी॥देवकीनेहृदईंधरिली॥जनआश्चिर्यकरितीसक
ळी॥अद्भुतकेलीकरणीहें॥९६॥पंथेंचेउनगोकुळीचेंजन॥श्रीकृष्णासारिलेभोजन॥पंचरात्रेंतेथें
क्रमुन॥सुखरीघलेंसमस्तां॥९७॥उपरीश्रीकृष्णाचीआज्ञाघेउन॥नंदयशोदागोळीजन॥गोकुळा
सगेलापरतोन॥श्रीकृष्णगुणआठवित॥९८॥सकळआरेसीमधुसूदन॥द्वारकेसिआलेंपरतोन॥
ग्रहणयात्राजालीपरिपूर्ण॥ब्रह्मानंदेकरूनियां॥९९॥यांवरीएकदिनीकृष्णसुत॥वनक्रीडेसिगेले
समस्त॥कंदुकखेळतखेळत॥आरण्यांतधावती॥१००॥कंदुकखेळतांउसळला॥महाकूपामा
जीजाउनपडिला॥सकळयादवतेवेळा॥कूपाआंतविलोकिती॥१॥आंतकिंचितहीनसेनीर॥मा
जीसरडपडिलासें पर्वताकार॥भयंकरमहाविकार॥उघडूननेत्रपाहातसे॥२॥यादवह्मणतीज

॥६॥

न्मवरी पाही ॥ येव ढा सरड देखिला चना ही ॥ एक धावोन लवला ही ॥ कृष्णास सांगती नवल वो ॥ ३ ॥
बहिरि मास हीत कमलवर ॥ तेथें पाहावया आला सत्वर ॥ कूपा माजि कौंस्तुभ घर ॥ पाहे सादर वि
लोकुनी ॥ ४ ॥ कृष्णा दृष्टी पाहतां साचार ॥ तत्काळ जाला याचा उधार ॥ पावोनियां दिव्य शरीर रा कू
पा बाहीर पातला ॥ ५ ॥ जो ब्रह्मादिकां वंद्य पूर्ण ॥ क्षीराब्धीवासी नारायण ॥ त्याचे धरिले दृढ च
रण ॥ प्रेमे करून तयानें ॥ ६ ॥ उभा ठाकला जोडून कर ॥ मग तयास पुसे श्रीधर ॥ तुं कोण येथें सां
गनिर्धार ॥ काय प्रश्नोत्तर बोलेतो ॥ ७ ॥ म्हणे माझें नाम नृगनृपवर ॥ पुण्यपंथें वर्ततां साचार ॥ म
ध्ये एक अपाय घडला घोर ॥ जाला कहर मजवरी ॥ ८ ॥ एक्या महापर्वकाळी ॥ ब्राह्मण बोला
उनस कळी ॥ तयास हस्त्र गोदानें अर्पिली ॥ सवछ विधि प्रकारे ॥ ९ ॥ पूजामान पावोन ब्राह्म
ण ॥ गेले आश्रमास गाई घेउन ॥ यांत एका ऋषीची गाय पळोन ॥ आली कळ्यांत आमुचीयां ॥ १० ॥
तो दूसरे दिवसी करून स्नान ॥ आणीक एक ब्राह्मणा लागुन ॥ ते च गाय दीधली नेणोन ॥ तव

तोब्राह्मण धावत आला ॥१२॥ तेणें येउन तेगाय धरली ॥ ह्मणे माझी हे पल्हो न म्हाली ॥ तो ह्मणे म
जआतां दीधली ॥ मीनसोडी सर्वथा ॥१३॥ एकासरकमांडती ब्राह्मण ॥ म्याधरिलें दोघाचें चर
ण ॥ पडिल्या ब्राह्मणास सहस्त्र गोदान ॥ द्यावयासी सिद्ध केलें ॥१४॥ तो ह्मणे मीनेघे सर्वथा ॥
माझी च गाय मज दे आतां ॥ दुसऱ्या ब्राह्मणासी प्रार्थितां ॥ तो ही सर्वथा नाऐके ॥१५॥ दोघे हीं
विप्रभांडतां ॥ न राहाती च राहाविता ॥ दोघी क्षोभुन ह्मणाया ॥ शापशस्त्रें ताडिले मज ॥१६॥
म्हणती महासरड होउन ॥ कूपामाजि पडे बहु दिन ॥ म्याधरिलें याचें चरण ॥ मग तेवचन बो
लिलें ॥१७॥ पुढें अवतरेल श्रीकृष्ण ॥ जो पूर्णब्रह्म सनातन ॥ याचें दृष्टि पडतां च उधरोन ॥
जासील ते व्हां स्वगती ॥१८॥ यादवास ह्मणे कृष्णनाथ ॥ पाहा अन्याय तरी किंचित ॥ केवढा
जाला अनर्थ ॥ पुण्यपुरुषां राया तें ॥१९॥ यालगी ब्राह्मणास भेउन ॥ वर्त्ततु ह्मी सावधा
न ॥ हे म्हासो तकाळ दिव्यविमान ॥ राया कारणे पातलें ॥२०॥ नमस्कारून हरिचरण ॥ न्ह

गराजगेला उल्हासेन॥ हरीपदप्रसादे करून॥ इंद्रभुवनी राहिला॥२१॥ द्वारकेंत प्रवेशला
कृष्णनाथ॥ तो भेटीस आला वीर पार्थ॥ चतुर रणपंडीत सुभद्राकांत॥ आवडे बहुत श्रीकृ
ष्णा॥२२॥ श्रीकृष्ण आवडी करून॥ हृदई आलिंगिला अर्जुन॥ परम प्रीति दोघा लागुन॥
पंक्तीस भोजन होजारी॥२३॥ एकासनी दोघा बैसणे॥ एकांतल्पकी निद्रा करणे॥ गुह्य
गोष्टी बोलणे॥ दोघीजणीर कांती॥२४॥ तो द्वारकेमाजि एक ब्राह्मण॥ याचीआठवा लगेली
सटवोन॥ मागुती स्त्री प्रसूती होउन॥ नववा पुत्र जाला॥२५॥ ब्राह्मण श्रीरंगाजवळि आला॥
बाळाचा वृत्तांत सांगीतला॥ हरी जो तो पुत्र पाचवे दिवसी गेला॥ उपाय मला सांग काही॥२६॥
आतां स्त्री जालीसे प्रसूत॥ एवढा तरी राखे सुत॥ तो बोले वीर पार्थ॥ मी रक्षीन निश्चित॥ बा
ळ तुझें॥२७॥ ब्राह्मण्याचे ग्रहास आला अर्जुन॥ म्हणे या बाळाचा मी रक्षीन प्राण॥ यमकाळ
उभे चिरिविलीन॥ निज सामर्थ्ये करूनियां॥२८॥ मी असतां सामर्थ्यवंत॥ काय करितील य

मदूत॥ कैसा सरटवेल विप्राचा सुत॥ तो आजि ससपाहीन॥१९॥ जरी या बाळाच्या गेला प्राण॥ तरी मीं
ही अग्निकाष्ट भक्षीन॥ ऐसा करूनियां पण॥ रक्षी अर्जुन समोवते॥२०॥ विप्राच्याग्रहावरून थो
र॥ दृढ रचिले बाणाचें मंदिर॥ दिव्य मंत्र जपोन समग्र॥ दिग्बंधन पार्थ करी॥२१॥ धनुष्यास लाउन बाण॥
शरीर क्षीत अर्जुन॥ तो प्रवर्त्तला पांचवा दिन॥ गेला प्राण बाळकाचा॥२२॥ जननी पिटी वक्षस्थळीं॥ आहरे
अर्जुना सरटवलें बाळ॥ पार्थ क्रोधावला सबळ॥ गेला तत्काळ यमपुरी॥२३॥ यमास पुसे वृत्तांत॥ तो ह्मणे न
वही बाळ येथें॥ म्या आणिली नाहीत सये॥ जाण यथार्थ कपिध्वजा॥२४॥ बाळकां कारणे पार्थ तें वेळे॥ चौ
दा लोकी झाडे घेतले॥ सर्व मृत्सपाताळ शोधिलें॥ परी बाळें न संपडती॥२५॥ आला द्वारकेसि परतोन॥ मग
चेतविला महा अग्नी॥ प्राण द्यावयास अर्जुन॥ सिद्ध जाला ते काळी॥२६॥ वृत्तांत ऐकोन सर्वेश्वर॥ पार्थ
जवळी आला सत्वर॥ कपिध्वजे वृत्तांत समग्र॥ श्रीरंगास सांगीतला॥२७॥ मग दिव्य रथ सज्जुन परि
कर॥ कृष्णें आणविला सत्वर॥ सावरी कमळावर आणि सुभद्रावर॥ बैसोनियां चालिले॥२८॥ पवनवे

॥८॥

गेरथजात॥ पृथ्वीमंडल उलंघिले हरीत॥ सप्तसमुद्र अद्भुत॥ क्रमुन मागें यकिलें॥३९॥ सप्तावरणें भेदुन॥
जेथें वसे आदिनारायण॥ तेथें नेउनियां अर्जुन॥ उभा केला श्रीकृष्ण॥४०॥ कोटिसूर्याची प्रभा जायेल पोन॥
ऐसा शेषशाई नारायण॥ ज्यांचिया पदांगुष्ठावरून॥ ब्रह्मांड चिवोवाळिजे॥४१॥ ते स्वरूप सतेज अपार॥
नेत्रीं पाहों न सके चीमित्र॥ त्याचें स्वरूपी वसुदेवपुत्र॥ मिळोन गेला अैक्यहत॥४२॥ परम थाबिरा जाला अ
र्जुन॥ पाहे तो जवळी नाहीं श्रीकृष्ण॥ अद्भुत तेज नलक्षवे पूर्ण॥ झांकी नयन भयें तेव्हां॥४३॥ नयन झां
कून पंडुसुत॥ श्रीकृष्णा नामें हाक देत॥ ह्मणे कैवारिया धावें त्वरीत॥ कां मज येथें सांडिलें॥४४॥ मंगळ
धामा राजीवनेत्रा॥ पुराणपुरुषा स्मरारीमित्रा॥ मन्मथजनका वसुदेवपुत्रा॥ धांवें सत्वरा मज लागी
॥४५॥ जलजासनजनका मधुसूदना॥ पांडवरक्षका भक्तरंजना॥ समरधीरा दानवभंजना॥ काढी
मज येथुनी॥४६॥ कासावीस जाला पार्थ॥ मग प्रगटला कृष्णनाथ॥ दिव्यचक्षु तयास देत॥ ह्मणे पाहा
अद्भुत तेज माझें॥४७॥ मग पार्थें उघडिली नेत्रकमळ॥ दिव्य स्वरूप न्याहाळीलें॥ तो तेथें नवेही बाळें

॥१॥

ब्राह्मणाची खेळती ॥४८॥ मग गरुउन आदिनारायण ॥ नवही बाळें घेतली मागोन ॥ रथी बैसोन कृष्णार्जुन ॥ आले परतोन द्वारके ॥४९॥ अर्जुना जवळी नवही बाळ ॥ श्रीकृष्णें दीधली तेवेळे ॥ मग ब्राह्मणा सबोलविले ॥ स्त्रियेसहीत ते धवां ॥५०॥ उभयास पूजन पार्थ ॥ समर्पिलें नवही सुत ॥ ब्राह्मण आनंदोन बहुत ॥ येशवर्णित पार्थाचे ॥५१॥ ब्राह्मण गेला ग्रहासी ॥ मग अर्जुन ह्मणे हृषीकेसी ॥ तुझी लीळा ब्रह्मादिकासी ॥ पाकशासन सिवासी आगम्य ॥५२॥ श्रीकृष्ण ह्मणे पार्था ॥ सर्वस्वरूपें मीच धर्ता ॥ येथें दुजया विना ही वार्ता ॥ कर्ताहर्ता मीच पैं ॥५३॥ ऐसी आज्ञा घेउन अर्जुन ॥ इंद्रप्रस्तास गेला परतोन ॥ सकळ अभिमान गाळुन ॥ कृष्णस्मरण वर्ततसे ॥५४॥ श्रीधर श्रोतयासि विनवित ॥ संपत आला हरिविजय ग्रंथ ॥ परी ये अनुसंधानी संम्मत ॥ पद्मपुराणी वेस्तूचले ॥५५॥ पद्मपुराणी पांडुरंगमहात्मा ॥ तेथें हे कथा आहे उत्तम ॥ श्रोती परिसीजे सप्रेम ॥ अत्यादरें करूनियां ॥५६॥ शची शक्राची अंगना ॥ ते एकदां गेली विष्णुभुवनी ॥ तो देखिला वैकुंठराणा ॥ लक्ष्मीसहीत तेवेळो ॥५७॥ करूनियां हरीस नमन ॥ उभी ठाकली कर जोडुन ॥

॥१॥

परीशाचीचें इछीमन॥अर्धांगीबैसावें हरीचे॥५८॥हापरमात्मा आदिनारायण॥जरीमीयांचें अंकी
बैसोन॥तरीचभाग्येपरिपूर्ण॥मगजगज्जीवनबोलत॥५९॥हरीह्मणेतें अवस्वरी॥शचीतुवांजें इ
छिलें अंतरी॥साटिसहस्त्रवरुषेंतपकरी॥हिमनगाचेंपाठारीमजलागी॥६०॥पुढेंमीधरीन कृ
ष्णावतार॥गोकुळीकरीनलीलाचरित्र॥तुंराधाहोउनसत्वर॥प्रगटेमगगोकुळीं॥६१॥तेथेंमीतु
जभोगीन॥मगमीकौंसवधासीजाईन॥तेवेळेतुंगुप्तहोउन॥द्वारकेसियेईवेगीं॥६२॥ऐसेंवर
पावोनतेअवस्वरी॥इंद्रायणीघोरतपकरी॥तेचप्रगटलीगोकुळाभीतरी॥भोगिलामुरारीकुंज
वनी॥६३॥मगमथुरेसिजातांहृषीकेसी॥वियोगनसाहेराधेसी॥गुप्तहोउनहिमाचलासी॥म

गुतीतयासीतेगेली॥६४॥मागुतीदिव्यरूपधरूनी॥तोचैंद्वारकेलागुनी॥श्रीकृष्णाराधेसी॥
गुप्तहोउनहिमाचलासी॥मागुतीतपासीतेगेली॥६५॥अद्यापिद्वारकेसिजाण॥श्रोतीपाहावेंज
उन॥होतराधाकृष्णापूजन॥सर्वजनदेखती॥६६॥आसोआर्धांगीराधाघेउनी॥बैसलाअस

॥१०॥

तों चक्रपाणी॥ तों तेथें आली रुक्मिणी॥ हरि चरण पाहावया॥६७॥ जन्ही सोळा सहस्त्र गोपिका आसती॥
सत्यभामा आदि सकळ युवती॥ परी ती ही येतां रुक्मिणी सती॥ बैसती हरि अंकी॥६८॥ रुक्मिणी येतां
च सकळा॥ उभ्या राहती गोपिबाळा॥ सर्व देखतां तेचि काळा॥ हरी अर्धांगी बैसत॥६९॥ सर्व देखतां
बैसे रुक्मिणी॥ परी ती देखतां न बैसावे कोण्ही॥ हे ज्ञानकळा पट्टराणी॥ इचीसरी कोण्ही न पवती॥७०॥
आसो रुक्मिणी आली जो एकदां॥ तो हरीच अर्धांगी बैसली राधा॥ न धरी रुक्मिणीची मर्यादा॥
चढिली क्रोधा भीमकी॥७१॥ पुढील भविष्य जाणोन॥ तत्काळ रुक्मिणी गेली रुसोन॥ दक्षणे दिंडी
रवनी येउन॥ तप करीत बैसली॥७२॥ दिंडीरवव[illegible]तेरु पंढरी॥ भीमातीरी भीमकी तप कैरी[illegible]
म जये थें पाहावया येईल मुरारी॥ द्वारकेहून आपण ची॥७३॥ दिंडीरवनांत॥ भीष्मकतनया त
प करीत॥ तो द्वारकेसी श्रीकृष्णनाथ॥ काय करिता जाला॥७४॥ रुक्मिणी जातां द्वारकेहुनी॥ क
ळाहीन सकळ कामिनी॥ ते सर्व सौभाग्य खाणी॥ गेली रुसोनी भीमातटां॥७५॥ मग रुक्मिणी

॥१०॥

कारणे कृष्णनाथ॥ सर्वत्र उर्विमंडल शोधिता॥ तो गोकुळासि आला त्वरीत॥ बाळवेष धरीते हां॥ ७६॥ सवें गाई गोपाळ घेउन॥ दक्षण दिसेस आला चक्रपाणी॥ शोधिता वनी उपवनी॥ ते रुक्मिणी विलक्षा॥ ७७॥ गोरक्षणाचा वेत्रधारी॥ तो चदंड धरी पूतनारी॥ शंखलो कमंडलु नि धारी॥ सन्यासी हरी जाला वाटे॥ ७८॥ श्रीवछांकितमनोहर॥ मुगटकुंडले मकराकार॥ नीलजीमूतवर्ण श्रीधर॥ बाल दिगंबर जाला॥ ७९॥ शोधिता शोधीत हृषीकेसी॥ आला लोहदंड क्षेत्रासी॥ दंडीरव वन ह्मणती यासी॥ तेथें द्वारकावासी पातला॥ ८०॥ माघें टाकून गाई गोपाळ॥ या वनांत प्रवेशे घननीळ॥ तो तेथें बैसली वेल्हाळ॥ तप करीत एकांती॥ ८१॥ आंकअंतरी धरून वेत्र॥ दोनी कटीठेउन हस्त॥ रुक्मिणी चें वदन विलोकित॥ उभा राहिला तेथें ची॥ ८२॥ ह्मणे पद्मनेत्री कामिनी॥ कां बैसली सयेथ येउनी॥ मज नगमे तुज वाचुनी॥ ह्मणउन धावोनी येथें आलों॥ ८३॥ ह्मणे प्रिय तुज विण॥ मज युगासमान जात से क्षण॥ मग रुक्मिणी बोले वचन॥ तुं आहेसि कोण सांग पां॥ ८४॥ चोरटिया सारिखा अकस्मात॥ उभा

॥११॥

गकलासयावनांत॥परांगनेसीबोलावयामात॥कायकारणतुजअसे॥८५॥परनारीसपियेह्मण
सी॥मजऐसेंवाटेमानसी॥बहुतेकपरद्वारीआहेसी॥बाह्यपणापासुनियां॥८६॥ऐसेंरुक्मीणीचे
वचन॥हास्यकरीतमधुसूदन॥मगहृदईदृढआलिंगुनाकेलेंसमाधानतयेचें॥८७॥तोपुढेंपुं
डलीकभक्त॥मातापितायाचीसेवाकरीत॥तेणेतोषलाजगंन्नाथ॥जाउनतेथेंउभाठाके॥८८॥
हरीह्मणेधन्यधन्यरेपुंडलीका॥वरमागेभक्तटिलका॥येरेंइटटाकिलीवैकुंठनायका॥बैसा
वयाकारणे॥८९॥तेइटेवरिपदजोडुनी॥दोहीकटीकरठेउनी॥उभाराहिलामोक्षदानी॥
पुंडलीकासीन्याहालीत॥९०॥मातापितयाचीसेवाकरुनी॥हरीसमीपआलापुंडलीकमुनी॥प्रेमेंल
गलाद्दढचरणी॥मगमोक्षदानीबोलत॥९१॥पुंडलीकावरमागेयेक्षणी॥येरूह्मणेजेसाआहेस
चक्रपाणी॥तेसाचचिरकालयेस्थानी॥उभाराहेभगवंता॥९२॥जेतुझादर्शनासयेती॥ज्ञानही
नमूढमती॥यांसदर्शनेंद्यावीमुक्ती॥हेचविनतीमाझीअसे॥९३॥आणियासेंत्रानावपंढरीनगर॥

॥११॥

दक्षणद्वारका हे साचार॥रुक्मिणीसहीत तुं सर्वेश्वर॥ाहे स्थिर येथें ची॥९४॥विठल हे नामाभिधान॥चाल
वावें आतां येथुन॥मज कोठें न वजावें सोडुन॥ऐसा पालुवा सर्वेसा॥९५॥ह्मणउन दक्षण द्वारका पंढरी॥जे
विख्यात भूमंडली वरी॥सकल द्वारकेचीसंपदा मुरारी॥आणिते ह्यां पंढरीये॥९६॥हाभीमातीर दिगंबर॥आ
दि पुरुष परात्पर॥आनंद संप्रदाय थोर॥जेथुनियां वाढला॥९७॥मूलगुरू आदि नारायण॥प्रथम शिष्य
चतुरानन॥आपुलें जे गुह्य ज्ञान॥ठेविले पूर्ण यापासी॥तेच ब्रह्मदेवें निज ज्ञान॥आत्री सदी धलें प्रीति
करून॥याचें पोटी परब्रह्म पूर्ण॥दत्तात्रय अवतरला॥९९॥आवतार उदंड होउन गेले॥परी दत्तात्रय
रूप आहे संचलें॥अत्रीने ज्ञान ठेविलें॥दत्तात्रयी सर्वही तें॥२००॥दत्तात्रयापासून॥सदानंदी बिंबलें
ज्ञान॥तेच रामानंदी ठसावोन॥परिपूर्ण पसरलें॥१॥तेथून आमलानंद मुनीश्वर॥जो गंभीरपणे जै
सा सागर॥तेथुंन ज्ञान समग्र॥ब्रह्मानंदी ठसावलें॥२॥तेथून सहसा मुनी॥ज्यांची समाधी असें क
ल्याणी॥तेथून पूर्णानंद पूर्णपणी॥आवतरला यतिराज॥२॥तेथून दत्तानंद तत्वता॥जो श्रीधराचा

पितयाचाहीपिता॥तोदत्तात्रयेचिमागुता॥अवतरलासहजस्थिती॥४॥तेथूनब्रह्मानंदसद्गुरु॥जोज्ञानाचामहामेरु॥श्रीधरवरतोनिर्विकारु॥भीमातीरनिवासीजो॥५॥शालिवाहनशकेसोळासेचोवीस॥चित्रभानुसंवत्सरास॥शुध्दबीजमार्गेश्वरमास॥तेदिवसीग्रंथसंपला॥६॥शुधबीजमार्गेश्वर॥ब्रह्मानंदस्वामीयतेश्वर॥तेदिवसींसमाधीस्तसाचार॥पंढरीयेभीमातटी॥७॥श्रीपांडुरंगवरदेकरून॥पंढरीसग्रंथजालानिर्माण॥एकदाश्रवणकरीतांसंपूर्ण॥पापेंदारुणभस्महोती॥८॥तीनआवर्त्तनवाचितांपवित्र॥कुळीहोयदिव्यपुत्र॥तोभक्तराजमहाचतुर॥होईलऐसेंजाणिजे॥९॥एकआवर्त्तनकरितां॥हरेघोरसंकटचिंता॥शत्रुपराजयतत्वतां॥श्रवणकरीहरिविजये॥१०॥कामक्रोधमदमत्सर॥हेचशत्रुअनिवार॥यांचापराजयहोईलसाचार॥श्रवणकरितांभावार्थे॥११॥हरिविजयकरितांश्रवण॥हरेसकळरोगआथवाऋण॥आपणप्रगटोनश्रीकृष्ण॥संकटयाचेनिरसील॥१२॥छत्तीसअध्यायेग्रंथतत्वतां॥प्रीतिपावोपंढरीनाथा॥याग्रंथाससमूळकर्त्ता॥पंढरीश

श्रीकृष्ण॥संकटाचें निरसील॥१२॥छत्तीस अध्याय ग्रंथ तत्वता॥प्रीति पावो पंढरीनाथा॥या ग्रंथास
समूळ कर्त्ता॥पंढरीराज जाणिजे॥१३॥जेजें विठल कपि सांगीतलें॥तेतें येथें पत्रीं लिहिलें॥न्यून्य
आथवा आगळें॥याचें तोच जाणे पैं॥१४॥दशम आणि हरिवंश पद्मपुराणीच्या कथा विशेषा॥याचें
हरिविजयीं सुरसा॥श्रोतीं सावकाश परिसीजे॥१५॥छतीस अध्याय हरिविजय॥पांडुरंगास परम
मप्रिये॥हा ग्रंथ संग्रहिता ते घर निर्भया॥सदा विजय होईजे॥१६॥हरिविजय ग्रंथ भांडार॥छत्ति
स कोठड्या याचें परिकर॥माजि रत्नें भरलीं नानाप्रकार॥जो हरीसंत परिक्षक॥१७॥छत्तीस
तत्वाचें हें सार॥कीं छत्तीस लक्ष्मीचें दामोदर॥कीं छत्तीस गंगा मिळोन समग्र॥हरिविजयसमुद्र
मरला॥१८॥कीं हे छत्तीस कोहळी धन॥दीधलें ब्रह्मानंदें दाउन॥कीं छत्तीस रत्नांचे वन॥निजभक्तिसें पूर्ण तुळसीवरी॥१९॥कीं हरिविजय ग्रंथराजेंद्र॥हे छत्तीस जणत्याचे
महावीर॥करितीस कळुपापाचा संहार॥प्रतापी धीर महा योधे॥२०॥कीं हरिविजय हे च

आकाश॥ तेथें हें छत्तीस चंडांश॥ ब्रह्मांड भेदुनि प्रकाश॥ पैलीकडे जायपैं॥ २१॥ कीं हे छत्तीस
वृक्षाचें वन॥ कीं छत्तीस क्षेत्रें पीकलीं पूर्ण॥ कीं हें पदक देदीप्यमान॥ छत्तीस रत्नांचें जडियलें
॥ २२॥ कीं हा प्रयागराज थोर॥ माघमास अति पवित्र॥ स्नान करिती पुण्यवंत नर॥ आ
धी बुडी देउनियां॥ २३॥ कीं हा भवरोगावरी दिव्यरस॥ बुद्धिमंद होय मतिप्रकाश॥ शुक सांगे प
रिक्षितीस॥ वारंवार गौरउनी॥ २४॥ प्रथम अध्याई मंगलाचरण॥ गणेश सरस्वती संतवर्ण
न॥ गुरुमहिमा सांगोन॥ प्रथमोध्याय संपविला॥ २५॥ दैत्य पृथ्वीवरी माजले॥ त्या पोनदेव क्षी
रसागरा सगेले॥ स्तवन करून सुरपरतले॥ असें हें कथिलें द्वितीयोध्याई॥ २६॥ वसुदेवाचें ल
ग्न॥ अवतरलें शेषनारायण॥ [illegible] णातीस ऱ्यांत॥ २७॥ ग
र्गे वर्णिले जातक॥ पालणा निजविला वैकुंठनायक॥ पूतना शोखिली निःशेख॥ चौथ्यांत हे च
कथिलें असें॥ २८॥ पाचव्यांत तृणावर्त येऊन॥ श्रीकृष्णा नेला उचलुन॥ नानाक्रीडारस दा

उन॥ मोहिले मनस वांचें॥ १९॥ साहाव्यांत वनमाळी॥ मातेपासी घेतली आली॥ गोपीनी ग्राह्मणी सांगीतली॥ कौतुके करनी यशोदे॥ २०॥ सातव्यांत हे चकथन॥ दशावतार लीला संपूर्ण॥ गोपीस दावीत श्रीकृष्ण॥ सांगती पूर्ण यशोदेसि ते॥ २१॥ आठव्या माजि कथन॥ पद्मपुराणीचें संमत पूर्ण॥ राधेने कृष्णा घरास नेउन॥ खेळविला बहु साल॥ २२॥ नवव्यांत हे चकथेची प्रौढी॥ कृष्णें केल्या बहुत खोडी॥ मायां उखळीबांधे तांतडी॥ यमलार्जुन उद्धरीले॥ २३॥ दाहाव्यांत गोपाळ काला करून॥ वनक्रीडा करीत श्रीकृष्ण॥ कमलोद्भवें केलें वछहरण॥ केले स्तवन प्रीतीने॥ २४॥ आकराव्यांत कालियामर्दन॥ बाराव्यांत गोवर्धनोधारण॥ तेराव्यांत कौंसदूत मर्दुन॥ गोरक्षपा केलें पै॥ २५॥ चौदाव्यांत अगासुर मर्दुन॥ नंद यमुनेंत गेला बुडोन॥ तोमाघारा आणि नारायण॥ वरुणापासी जाउनियां॥ २६॥ पंधराव्यांत हे चकथन॥ कृष्णें घेतले देवकीचें वाण॥ वनांत राधेस मागे हरीदान॥ ते चवर्णन बहु असे॥ २७॥ सोळाव्यांत य

जपत्न्यानी येउन॥ हरीस समर्पिले अन्न॥ रासक्रीडा संपूर्ण॥ सेत्राव्यांत कथियली॥ ३७॥ आठरा
व्यांत निरोपण॥ अक्रुर कृष्णास गेला घेउन॥ येकोणीसावा अध्याई कौंस वधून॥ राज्य दीध
ले उग्रसेन॥ ३८॥ विसावा अध्याये अति सुरस॥ कृष्णा शरण संदीपनास॥ अद्भुत कथिला ज्ञा
नरस॥ गुरुशिष्य लक्षण॥ ३९॥ एक्केवीसावां तउधव येउन॥ गोपीस कथिले ब्रह्मज्ञान॥ बा
वीसाव्यांत जरासंद पराभउन॥ कालयवन भस्म कैला॥ ४०॥ तेविसावा चोविसावा सार॥ ये
थे कथिले रुक्मिणी सैवर॥ पंचविसाव्यांत सवेश्वर॥ जांबुवंती प्रणुन आला॥ ४१॥ सवीसा
व्यांत कृष्ण नायका॥ आणिल्या शोडश सहस्त्र गोपिका॥ सत्तावीसावा रुक्मिणी विनोद देख
आणि प्रद्युम्न उपजला॥ ४२॥ आठावीसांत उखाहरण॥ मुजा छेदुन त्रासिला बाण॥ येक
णोतीसावांत दरिद्र हरण॥ सुदाम याचें केले दैं॥ ४३॥ तीसाव्यांत सत्यभामा विनोद॥ नारदा
स दान दीधला गोविंद॥ यकसाव्यांत गरुडाचा गर्वभेद॥ हनुमंता हाती करविला॥ ४४॥

बतीसाव्यांत सुभद्राहरण॥ नारदास घरोघरी कृष्णदर्शन॥ तेत्तीसाव्यांत राजसयज्ञ॥ जरासंद मारविला॥ ४५॥ बत्तीसाव्यांत सुभद्राहरण नारदास घरोघरी कृष्णदर्शन तेत्तीसाव्यांत राजसयज्ञ जरासंद मारविला ॰ चौतीसाव्यांत कथा निश्चिती॥ वाढीत आसतां द्रौपदी सती॥ बिरडे तुटतां श्रीपती॥ चतुर्भुज करिती तें॥ ४६॥ पचेतीसावे अध्याई समग्र सभा वर्णन॥ शुशुपाल वक्रदंत वधुन॥ विजया जाला मधुसूदन॥ हे चकथन आसे साव्या॥ ४७॥ छत्तीसाव्यांत ग्रहणयात्रा कथन॥ भेटिले गोकुळीचे जन॥ उपरी पंढरीस आला श्रीकृष्ण॥ हे चनिरोपण सेवटी॥ ४८॥ ऐसा छतीस अध्याये ग्रंथ॥ हरिविजय हा यथार्थ॥ सदा अवलोकित भक्त संत॥ विवेक दृष्टी करूनियां॥ ४९॥ पंढरीहून च्यारि योजने दुर॥ पश्चमेसी नाझरे चें नाम नगर॥ तेथील देशलेखक साचार॥ ब्रह्मानंद पूर्वाश्रमी॥ ५०॥ पुढे पंढरीये सि जाउन॥ मग केले सन्यास ग्रहण॥ यावरी भीमातीरीच संपूर्ण॥ समाधिस्त निज सुखी॥ ५१॥ तो ब्रह्मानंद महाराज पिता॥ सावित्री नाम माझी मा

ना॥श्रीधर वंदून उभयतां॥ हरिविजय ग्रंथ संपविलें॥५२॥ सकल श्रोतयांसी आदरें॥ साष्टांग नमन श्री
धर॥ब्रह्मानंदें करून निर्धार॥ हरिविजय विलोकिजो॥५३॥ ॥इति श्री हरिविजय ग्रंथ॥ संमत हरिवं
श भागवत॥ सदा परिसोत प्रेमळ पंडीत॥ षटत्रिंश अध्याय सेवटीचा॥२५४॥२५४॥ ॥छ॥छ॥
छ॥
यादृशी पुस्तकं दृष्ट्वा तादृशी लिखितं मया॥ अबद्धं वा सुबद्धं वा मम दोषो न विद्यते॥१॥ भग्न पृष्टि क
टि ग्रीव नीच दृष्टि अधोमुखं॥ कष्टेन लिखितं ग्रंथं यत्नेन परिपालया॥२॥ तैलाद्रक्षेत् जलाद्रक्षेत् रक्षे
यं दृढबंधनं॥ मूर्ख हस्ते न दातव्यं इति पुस्तक रक्षितं॥३॥ सके १६८ प्रवर्तमाने नंदन नाम संवत्स
र चैत्र शुध १२ बुधवार दिवसी ग्रंथ संपला॥ ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥
ग्रंथ संपूर्णमस्तु॥ ॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥ ॥हस्ताक्षर गोसावी श्री निवास हुलसुर वास्तव्य ध
नवाडे॥छ॥छ॥